# झांशीची राणी

आणि

सत्तावन सालच्या बंडाचे ऐतिहासिक कार्य



954.03
HAD
79388

954.03
HAD
79388

विठ्ठल वामन हडप

# झांशीची राणी

## आणि

## सत्तावन सालच्या बंडाचें ऐतिहासिक कार्य

### १ : विषयप्रवेश

झांशी आणि झांशीची राणी लक्ष्मी! ही नुसती आठवण झाली पुरे, कीं चित्तवृत्ति अशा थरारून येतात, अशा थरारून येतात, कीं त्याचें वर्णन करायला भाषेंतले शब्द अपुरे पडतात! क्षणभर धरणीकंपाचे धक्के पुरवले; कोणीं विजेचे धक्के अंतःकरणाला दिले तर तेदेखील पुरवले! शेंकडों तोफांचे रसरसते आगगोळे अथवा बॉंबगोळे, हजारों तरवारींचे घाव, लाखों बंदुकींच्या जळत्या गोळ्या, लाखों सर्पविंचूंचे दंश, वडवानलाच्या ज्वाळा,–हिंदी राष्ट्राचा सुपुत्र खास म्हणेल कीं ह्या सर्व वेदना सहन होतील पण राणी लक्ष्मीच्या आठवणीनें अंतःकरणाला बसणारे धक्के, डसणारे दंश, झोंबणाऱ्या ज्वाळा अथवा प्रत्यक्ष भासणाऱ्या वेदना मात्र सहन होत नाहींत!

आणि असें हिंदुस्थानांतील हिंदूच म्हणेल असें नाहीं तर मुसलमानदेखील असेंच म्हणेल. इतर हरएक बाबींत हिंदुस्थानाला आपल्या राक्षसी स्वार्थैक दृष्टीमुळें पाण्यांत पाहणाऱ्या इंग्रज इतिहासकारांनींदेखील, राणी लक्ष्मीची प्रशंसा केल्यानें हिंदी लोकांना भलेपणा दिल्याचा अपवाद येतो हें माहीत असूनही तिचीं स्तुतिस्तोत्रें मुक्तकंठानें गाइलीं आहेत; तिथें एथल्या हिंदु-मुसलमानांची काय कथा! ते तर भाऊ भाऊ! एकाच भूमींत जन्माला आलेले, एकाच मायभूमीचा पान्हा पिऊन लहानाचे मोठे झालेले, हिंदुस्थानच्या एकाच घरांत राहणारे, एकाच गंगा–यमुना–कृष्णा–गोदावरीचें जिवंत पाणी पिणारे, व एकाच शेतांत कष्ट करून धनधान्य पिकवून उदर-निर्वाह करणारे आहेत. त्यांच्यांतही भाऊबंदकीचा वणवा चेतविणारे चेतवोत;